# राशिभविष्य - नोव्हेम्बर, २०१९.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

==============================================================

**(१) मेष -** या राशीच्या प्रथम स्थानी विक्षिप्त स्वभावाचा हर्षल असल्यामुळे सध्या या राशीच्या मंडळींचा स्वभाव अतिशय अस्थिर, चंचल, , लहरी झाला असण्याची शक्यता वाटते. तसे असेल तर कोणी काही समजुतीच्या चार गोष्टी सांगितल्या तर ते असह्य होत असले पाहिजे. या राशीची लहान मुले तर सध्या अतिशय हूड, वांड झाली असावीत, असे वाटते. असे असले तरी हा हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या तृतीय स्थानी असलेला राहू या राशीच्या मंडळींकडून मोठा पराक्रम, मोठे कर्तृत्व घडवेल व हातून मोठ्या मनाचे आचरण घडू शकेल. पण या राहूमुळे बंधुसुखात बाधा येण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या षष्ठ-सप्तम स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे महिन्याच्या पूर्वार्धात शारीरिक उष्णता भडकून उष्णतेचे आजार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. ताप येणे, इजा होणे, अंगावर फोड येणे, अपप्रचाराचा मनस्ताप होणे, चोरी होणे, अर्थहानी होणे अशापैकी घटना घडून शारीरिक-मानसिक आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. रक्तविकार, हृदयविकार असणारांनी विशेष काळजी घ्यावी. महिन्याच्या दहा तारखेनंतर हा मंगळ या राशजींच्या सप्तम स्थानी गेल्यावर वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. पतिपत्नीपैकी कोणाचे अनारोग्य, दोघांतही वाद, भांडणे, गैरसमज अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांनी संशय, गैरसमज अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. या राशीच्या सप्तम स्थानी असलेला रवि ग्रह केंद्रस्थानी असल्याने नोकरदार मंडळींना अनुकुल होईल; पण त्याच्यामुळे काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. महिन्याच्या उत्तरार्धात हा रवि या राशीच्या अष्टम स्थानी गेल्यावर प्रतिकुल होईल व त्यामुळे दु:ख, अपयश, रोगप्रतिकारशक्ती क्षीण होणे, आजार होणे, भावनेच्या भरात काहीही करणे इच्छा अपूर्ण राहणे, संततिसुखात बाधा येणे अशापैकी घटना घडणे संभवते. पण या राशीच्या अष्टम स्थानी असलेले गुरु-शुक्र हे शुभ ग्रह अनुकुल असल्यामुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने असा धनलाभ होऊ शकेल. काही मंडळींना कमी श्रमात अपेक्षेपेक्षा अधिक अर्थलाभ होईल. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या शनिमुळे प्रवासयोग येईल; तर- केतूमुळे या राशीच्या काही मंडळींचे आचरण ढोंगीपणाचे होणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे आर्थिक चिंता, आर्थिक नुकसान, आर्थिक घोटाळे अशापैकी घटना घडणे संभवते. त्यामुळे काही मंडळींना नैराश्य येईल. काही मंडळींना कुमार्गी मित्रांचा त्रास सहन करावा लागेल. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना मन:शांती
देईल. दररोज स्नान झाल्यावर “श्रीगणेश अथर्वशीर्षा”चे पठण करा. तसेच २१ वेळा “ओम गं गणपतये नमः:” मंत्राचा जप करा.

**(२) वृषभ -** या राशीच्या व्ययस्थानी असलेला हर्षल आणि धनस्थानी राहू प्रतिकुल असल्याने सांपत्तिक अडचणी येणे संभवते. त्यामुळे आर्थिक व्यवहार विचारपूर्वक करा. हर्षलमुळे नको त्या वाईट प्रसंगाला तोंड द्यावे लागण्याची शक्यता आहे. जपा. क्वचित कोणास बेअब्रूच्या प्रसंगालाही तोंड द्यावे लागण्याची शक्यता दिसते. अकारण शत्रुत्व निर्माण होणेही संभवते. जपा. राहूमुळे

कौटुंबिक जीवनात कलह, भांडणे होणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी असलेला मंगळ संततीचे बाबतीत त्रासदायक होणे संभवते. मुलांपैकी कोणी ऐन परीक्षेचे वेळी आजारी पडेल, तर कोणाची आचरणविषयक समस्या त्रस्त करील. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या मंडळींना शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. ताप येणे, इजा होणे, अंगावर फोड येणे, रक्तविकार, हृदयविकार बळावणे अशापैकी आजार होणे संभवते. त्याशिवाय काही मंडळींना अपप्रचाराचा मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. त्याशिवाय चोरी होणेही शक्य आहे. जपा. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला रवि ग्रह नोकरी-व्यवसायास पूरक होईल, व महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर केंद्रस्थानी असल्याने अनुकुल व लाभदायक होईल. बुध ग्रह अनुकुल असला तरी तो वक्री असल्याने अपेक्षेइतका अनुकुल होणार नाही. या राशीच्या सप्तम स्थानी असलेले गुरु-शुक्र हे दोन्ही शुभ ग्रह अनुकुल असून या राशीच्या प्रेमिकांचे प्रेमविवाह संपन्न होतील. काही मंडळींच्या प्रेमसंबंधात दृढता निर्माण होईल. काही मंडळींना विवाहयोग येईल. वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. काही मंडळींचे नवे स्नेहसंबंध जुळून येतील. प्रवासयोग येतील. तसेच अर्थलाभ होणेही शक्य आहे. या राशीच्या अष्टम स्थानी असलेला शनि ग्रह अनारोग्यकारक असून काही मंडळींना एखादा मोठा आजार होणे संभवते. जपा. तसेच असमाधानकारक घटना घडणे, अपेक्षाभंग होणेही संभवते. जपा. शनि सह असलेला केतूही अनारोग्यकारक होणे संभवते. त्यामुळे काही मंडळींना त्वचारोगाचा किंवा मुखदंत विकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. जपा. पण सप्तम स्थानी असलेले गुरु-शुक्र या राशीच्या अष्टम स्थानी गेल्यावर या राशीच्या काही मंडळींना कमी श्रमात अपेक्षेपेक्षा अधिक अर्थलाभ होईल. ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काहींना वारसाहक्काने असा धनलाभ होईल. मात्र या राशीच्या वयोवृद्ध मंडळींनी सांभाळून आचरण करावे. या राशीच्या दशम स्थानी असलेला नेपच्यून मनोवैज्ञानिक व द्रव पदार्थांचे व्यापारी यांना अनुकुल व लाभदायक होईल. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज स्नान झाल्यावर पुरुषांनी " ओम नमः: शिवाय" मंत्राचा तर स्त्रियांनी "ओम शिवाय नमः:" मंत्राचा एक माळ जप करावा. तसेच दररोज नियमितपणे "शिवलीलामृत " स्तोत्राचे पठण करावे.

**(३) मिथुन -** या राशीच्या प्रथम स्थानी राहू असल्यामुळे या राशीच्या मंडळींचे कारण असो वा नसो सतत अपमान होणे संभवते. त्यामुळे असह्य संताप येऊन सूडभावना प्रबळ होणे संभवते. जपा. या राहुमुळे काही मंडळींना वातविकाराचा आजार त्रस्त करीतसे दिसते. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेला मंगळ कौटुंबिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करील. वाद, गैरसमज, अन्य कारणे अशामुळे घरातील वातावरण सतत तप्त राहील. जपा. त्याचप्रमाणे कुटुंबात काही अनिष्ट घटना घडणेही संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात हा मंगळ या राशीच्या पंचम स्थानी गेल्यावर संतति समस्या त्रस्त करण्याची शक्यता आहे. मुलांपैकी कोणाचे आजारपण, कोणाचे विचित्र आचरण अशापैकी कारणांनी चिंतीत व्हाल. जपा. काही मंडळींना राहत्या घराची समस्या किंवा स्थावरसंबंधी समस्या अस्वस्थ करील. या राशीच्या नोकरदार मंडळींना नोकरीत या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल होईल. हितशत्रू पराभूत होतील. महिन्याच्या पूर्वार्धात रवि -बुध प्रतिकुल असल्याने नोकरीत वरिष्ठांचा त्रास तर घरी कौटुंबिक समस्यांचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. त्यामुळे अनारोग्य होणे शक्य आहे. जपा. हृदयविकार असणारांनी मनस्थिती शांत ठेवावी व

सहनशील बनून आचरण करावे. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेले गुरु-शुक्र अनुकुल असल्यामुळे मनोनुकुल घटना घडतील. पण शुक्रामुळे महिन्याच्या पूर्वार्धात गुणवत्ता असूनही काही मंडळींना गुणवत्ता सिद्ध करण्याची संधीच मिळणार नाही. पण हे गुरु -शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर अनुकुल होतील; पण त्याच स्थानी असलेल्या शनि -केतूमुळे प्रेमसंबंध जुळून आले असताही विवाहयोग संभवत नाही. केतुमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी असलेला नेपच्यून आध्यात्मिक साधनेस अनुकुल असून उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. काही मंडळींना सूचक स्वप्ने पडण्याची शक्यता आहे. तसेच काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळणेही शक्य आहे. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या हर्षल ग्रहामुळे अपेक्षेनुसार सर्व काही घडेलच याची खात्री देता येत नाही. शिवाय त्याच्यामुळे मित्रांशी भांडणे होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज स्नान झाल्यावर नियमितपणे “ओम गं गणपतये नम: “ मंत्राचा २१ वेळा जप करा. तसेच “श्रीगणेश अथर्वशीर्षा”चे पठण करा.

**(४) कर्क -** या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. पण महिन्याचे पहिले ९ दिवस मंगळाच्या अनुकुलतेमुळे उत्साही परिस्थितीत जातील. पण नंतर तो या राशीच्या चतुर्थ स्थानी गेल्यावर प्रतिकुल होईल व कौटुंबिक सुखात बाधा निर्माण करील. घरात सतत वाद, भांडणे, गैरसमज अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. तसेच काही असमाधानकारक घटना घडणेही संभवते. या राशीच्या काही मंडळींना राहत्या जागेची समस्या त्रस्त करील; तर काहींना स्थावरसंबंधी समस्या त्रस्त करील. त्यामुळे नैराश्य येणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या राशीच्या पंचम स्थानी गेल्यावर घरीदारी, नोकरीचे ठिकाणी सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता आहे. स्वतः:चे व संततीपैकी कोणाचे आजारपण, प्रिय जनांपासून होणारा दुरावा, नोकरीत वरिष्ठांचा त्रास अशापैकी कारणांनी गहिरे नैराश्य येणे संभवते. अशा परिस्थितीत सतत सावधानतेने आचरण करा. कारण अपघात भय आहे. शुक्रामुळे महिन्याचा पूर्वार्ध सर्व प्रकारच्या कलावंतांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. परंतु महिन्याच्या उत्तरार्धात कोणत्याही कार्यक्षेत्रात गुणवत्ता असूनही कर्तृत्व सिद्ध करण्यास संधीच मिळणार नाही. या राशीच्या षष्ठ स्थानी आलेले गुरु-शनि -केतू ग्रह दशम स्थानास पोषक होतील. त्यामुळे उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना या महिन्याचा संपूर्ण काळ प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. सर्वांगीण आरोग्य उत्तम राहील. पण येथील शनि ग्रह अकारण शत्रुत्वही निर्माण करील. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी असलेला नेपच्यून जलभय कारक व विषभयकारक असल्याने पाण्यापासून जपा. खोल पाण्यात पोहावयाचे धाडस करू नका. तसेच रस्त्यावरील उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या व्ययस्थानी असलेल्या राहूमुळे हितशत्रूपासून रक्षण होईल, अर्थलाभ होणेही संभवते. काही मंडळींना परदेशगमनाचा योग येईल. आपली राशी ही गुरुदेव दत्तात्रेयाची उच्च राशी असल्याने दररोज नियमितपणे स्नान झाल्यावर “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”:चे पठण करा.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा पहिला आठवडा अनारोग्याचा व आर्थिक समस्या त्रस्त करणारा असल्याचा अनुभव येईल. या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच सर्व दृष्टींनी अनुकुल, सुखकारक, लाभदायक व वरिष्ठांचा कृपाप्रसाद मिळविणारा असा

असल्याचा अनुभव येईल. त्यातून काही मंडळींना बढती, काहींना अधिकार पद, क्वचित कोणास एखादे उच्च पद किंवा मानाचे स्थान मिळणेही शक्य आहे. त्यामुळे महत्त्वाकांक्षा वाढेल, आरोग्य उत्तम राहील व सात्विक सुखसमाधान लाभेल. पण महिन्याचा उत्तरार्ध कौटुंबिक सुखाचे दृष्टीने व आरोग्याचे दृष्टीने मनस्तापदायक होणे संभवते. बुधामुळे हितशत्रूंचा त्रास होणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी शुक्र ग्रह असेपर्यंत कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. शेती व्यवसाय असणारांना लाभदायक होईल. नंतर तो या राशीच्या पंचम स्थानी गेल्यावर सर्व प्रकारच्या कलाकार मंडळींना अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या पंचम स्थानी असलेले गुरु-शनि चिकित्सक बौद्धिक क्षेत्र असणारांना व या राशीच्या विद्यार्थ्यांना अनुकुल , प्रगतिकारक व यशदायक होतील. या राशीच्या सप्तम स्थानी असलेला नेपच्यून विविध कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. जपा. गुरु-हर्षल शुभ योग असल्याने या राशीच्या भाग्यस्थानी असलेला हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना प्रगतिकारक व लाभदायक होईल. काही मंडळींना दूरच्या प्रवासाची तर काहींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या लाभ स्थानी असलेला राहू संततिविषयक चिंता त्रस्त करीतसे दिसते. तसेच या राशीची जी अधिकारी मंडळी आहेत त्यांना वाममार्ग धन मिळविण्यासाठी आपल्या अधिकाराचा गैरवापर करण्याची दुर्बुद्धी होईल. जपा. श्रद्धा असेल तर आपल्या कुलदैवताची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळींना त्यांच्या स्वाभाविक दोषांमुळेच अकारण असह्य मनस्ताप सहन करावा लागेल.जपा. हट्टी स्वभाव, मानापमान फार, त्यामुळे अकारण श्रम व दगदग कराल व त्यामुळे थकवा येऊन उष्णताविकाराचा एखादा आजार त्रस्त करील. जपा. या राशीच्या दशम स्थानी असलेला हर्षल व तृतीय स्थानी असलेला रवि अनुकुल असल्याने या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा उत्तरार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल. वरिष्ठ अधिकारी तुमच्या कर्तृत्वाला दाद देतील. काहींना बढती, तर एखाद्याला मानाचे स्थान मिळणेही संभवते. शिवाय शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने काही मंडळींना भूमिलाभ तर काही मंडळींना धनलाभ होणेही संभवते. पण महिन्याच्या पूर्वार्धात वाढता खर्च, वित्त हानी, अशापैकी आर्थिक समस्या त्रस्त करतील. शिवाय अनपेक्षितपणे येऊन उभ्या ठाकलेल्या काही आर्थिक जबाबदाऱ्या कशा पूर्ण करावयाच्या याची चिंताही त्रस्त करील. त्यामुळेच शारीरिक अनारोग्य होणे संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी असलेला शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी गेल्यावर त्याच स्थानी असलेल्या गुरु-शनि -केतु यांच्या युतीत येईल व त्यामुळे थोडा दिलासा मिळेल. कारण शनि व केतू ग्रह प्रतिकुल असल्याने कोणाशी पटणार नाही व त्यामुळे गृहसौख्यात बाधा येणे संभवते. पण तेथील गुरु ग्रहामुळे परिस्थिती आटोक्यात राहील. काही मंडळींचे स्थावर खरेदी विक्रीचे व्यवहार अपेक्षेनुसार पार पडतील; तर ज्यांची शेतीवाडी आहे अशांना त्यापासून लाभ होईल. तरीही नातेवाईक मंडळींपैकी कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाणे संभवते. जपा. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे काही मंडळींना फसवणुकीचा त्रास होईल; तर काहींना काल्पनिक चिंता त्रस्त करतील. शिवाय काही मंडळींना " आपल्याला कसला तरी आजार झाला असल्याची भावना " त्रस्त करील. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या हर्षलमुळे अपघात भय आहे. त्यामुळे सतत सावधानतेने आचरण करा. रस्त्याने जाताना किंवा वाहन चालवीत असता मोबाईलवर वार्तालाप करू नका. विजेवर चालणारी उपकरणे सावधानतेने हाताळा . श्रद्धा

असेल तर श्रीगणेश उपासना करा. दररोज स्नान झाल्यावर श्रीगणेश अथर्वशीर्षाचे पठण करा व २१ वेळा " ओम गं गणपतये नमः:" मंत्राचा जप करा.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नसल्याने त्यांनी या काळात सतत मनावर व विचारशक्तीवर ताबा ठेवून व सहनशील बनूनच आचरण करावे, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. असे वागणेच सुखाचे होईल. शिवाय सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अतिशय भावनाशील झाली असल्यास त्यांनी मन:शक्ती प्राप्त करण्यासाठी आध्यात्मिक उपासना करावी. त्यासाठी काळ अनुकुल आहे. या राशीच्या सप्तम स्थानी हर्षल असल्यामुळे पतिपत्नीपैकी कोणाचे तरी लहरी, विक्षिप्त आचरण, दोघांतील वाद, भांडणे, गैरसमज अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांनी संशय, गैरसमज अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. रवि -मंगळ -बुध हे तिन्ही ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असून रवि -.मंगळ हे दोन्ही ग्रह अनारोग्यकारक व सतत मनस्ताप देणारे असल्याचाच अनुभव येईल. आपल्या वर्तमान हट्टी, मानापमानच्या अवास्तव कल्पना असलेल्या स्वभावामुळे आपण अकारण श्रम, दगदग कराल व त्यामुळे शारीरिक-मानसिक थकवा येईल. तसेच उष्णताविकाराचा एखादा आजारही त्रस्त करण्याची शक्यता आहे. वाढत्या खर्चाची तसेच वित्तहानीची आर्थिक चिंता त्रस्त करील. बुधामुळे मित्रांशी वाकडे येणे संभवते. तसेच काही मंडळींना कुसंगतीची बाधा होणेही संभवते. नोकरी-व्यवसायात सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता आहे. व्यय स्थानी असलेल्या मंगळामुळे या राशीच्या स्त्री-वर्गाला आवश्यक अशा वस्तूंचा व्यापार असणारांना स्त्री-ग्राहकांपासून मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. जपा. उलट शुक्राच्या अनुकुलतेने या राशीच्या कोणताही व्यापार असणाऱ्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होणे संभवते. धनस्थानी असलेल्या शुक्रामुळे कौटुंबिक सुख लाभेल. हा शुक्र या राशीच्या तृतीय स्थानी गेल्यावर काही मंडळींना भूमिलाभ तर काहींना एखादे मानाचे स्थान मिळणे संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे काही मंडळींना उत्तम नोकरी किंवा आवडते कार्यक्षेत्र मिळण्याची शक्यता आहे. पण हा शनि भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करील. याच तृतीय स्थानी असलेला गुरु ग्रह या राशीच्या साहित्यिकांना अनुकुल होईल व त्यांचे लेखन ग्रंथरूपाने प्रकाशित होईल. पण येथील गुरूमुळे भावंडापैकी कोणाकडून तरी असह्य त्रास होणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीशंकराची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती लाभेल. या राशीच्या पुरुषानी दररोज स्नान झाल्यावर "ओम नमः: शिवाय " मंत्राचा व स्त्रियांनी "ओम शिवाय नमः: " मंत्राचा एक माळ जप करावा. तसेच "शिवलीलामृत" स्तोत्राचे पठण करावे.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळींना शनि ग्रहाच्या साडेसातीचा केवळ अडीच -तीन महिन्यांचा मनस्ताप देणारा काळ सहन करावा लागेल. तेवढा काळ मनावर, विचारांवर व हट्टी, संतापी स्वभावावर नियंत्रण ठेवून आणि सहनशील बनून सतत आचरण केलेत तर गुरु-शुक्राच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे ज्या मनोनुकुल घटना घडतील त्यांचा आनंद व सुखसमाधान अनुभवू शकाल. मंगळ व रवि ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे सतत मनाविरुद्ध घटना घडतील, त्यामुळे मनस्थिती अस्वस्थ राहील. शिवाय शारीरिक उष्णता भडकून उष्णतेचा एखादा आजारही होणे संभवते. विशेष करून डोळ्याचा आजार होणे संभवते. रक्तविकार, हृदयविकार असणारांनी

मनाचा क्षोभ होणार नाही याची दक्षता घ्यावी. हा मंगळ महिन्याचे पहिले नऊ दिवस या राशीच्या लाभस्थानी असल्यामुळे मित्रांशी वितुष्ट येणे संभवते. काही भाग्यवान मंडळींना मौल्यवान वस्तूचा लाभ होणेही संभवते. व्ययस्थानी असलेल्या बुध ग्रहामुळे हाती घेतलेल्या कामात अपयश येणे, मानहानी होणे, अर्थहानी होणे संभवते. या राशीच्या नोकरदार मंडळींना नोकरीचे ठिकाणी कामाचा ताण, वरिष्ठांचा जाच, भांडणे, वाढता खर्च, त्यामुळे आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. कुटुंबस्थानी (धनस्थानी ) असलेले शनि -केतू प्रतिकुल असून त्यांच्यामुळे कुटुंबात अनिष्ट घटना घडणे संभवते. काही मंडळींना कोर्ट प्रकरणाचा त्रास सहन करावा लागेल. पण गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने कौटुंबिक जीवनात अनेक शुभ व मनोनुकुल घटना घडतील, व दिलासा मिळेल. व्यावसायिकांच्या व्यवसायात वाढ होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे घरगुती बाबतीत गैरसमज, घोटाळे अशापैकी कारणांनी गृहसौख्यात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला हर्षल बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यास पूरक होईल. पण या हर्षलमुळे सतत अति खोल विचार कराल तर काही मंडळींना डोकेदुखीचा तर क्वचित कोणास मेंदूविकाराचा आजार होणे संभवते. जपा. हा हर्षल मनस्थितीही अस्थिर, चंचल ठेवील. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. पण या राहूमुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने असा धनलाभ मिळू शकेल. श्रद्धा असेल तर “श्रीगणेश” व “श्री हनुमान “ उपासना अनुकल
होईल व मन:शक्ती व मन:शांती प्राप्त होईल. दररोज स्नान झाल्यावर २१ वेळा “ओम गं गणपतये नमः: “ मंत्राचा जप करा. तसेच “श्रीगणेश अथर्वशीर्षा”चे व “श्रीहनुमानचालिसा” स्तोत्राचे पठण करा.

**(९) धनु -** या राशीच्या सर्व नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल. सबब या राशीच्या मंडळींनी जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधावयाचा आटोकाट प्रयत्न करावा. रवि -बुध पूर्णपणे अनुकुल आहेत . बुधामुळे काहींना धनलाभ होणेही संभवते. शिवाय नवे मित्र मिळण्याची शक्यता आहे. पण महिन्याच्या उत्तरार्धात मंगळ या राशीच्या लाभस्थानी आल्यावर अपेक्षित असे सहजासहजी काही होणार नाही. उलट मित्रांशी काहीही कारणाने वितुष्ट येण्याची शक्यता आहे. पण या मंगळामुळे काही मंडळींना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणेही संभवते. हा मंगळ या राशीच्या दशम स्थानी असेपर्यंत औषध विक्रेत्यांना अनुकुल व लाभदायक होईल. नंतर इतर व्यावसायिकांच्याप्रमाणे तो प्रतिकुल असेल व नोकरी-व्यवसायात कामाचा ताण, खळबळजनक घटना घडण्याची शक्यता आहे. त्यामुळे काही मंडळींना हातचे सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि येईल. पण त्यांनी तसे करू नये. सहनशील बनून आहे तो नोकरी-व्यवसायच निष्ठेने करावा. या राशीच्या प्रथम स्थानी असलेल्या शनि -केतूमुळे स्वतः:चे व जीवनसाथीचे अनारोग्य, नियोजित कार्यात अडचणी, अडथळे येणे, कुटुंबातील प्रिय जनांपैकी कोणाचे
स्थलांतर होणे संभवते. केतूमुळे वाहनधोका असल्यामुळे रस्त्याने सावधानतेने चाला, वाहन नियंत्रित वेगाने व सावधानतेनेच चालवा. पण गुरु-शुक्र हे दोन्ही ग्रह संपूर्ण महिनाभर अनुकुल असल्याने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. प्रथम स्थानी असलेला गुरु ग्रह बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे या राशीच्या मंडळीची मनस्थिती अत्यंत भावनाशील झाली असावी, असे वाटते. हा नेपच्यून अध्यात्म व गूढ संशोधन कार्यास उपयुक्त

होईल. उपासनेद्वारे अध्यात्मात प्रगती करणे शक्य होईल. त्याशिवाय या नेपच्यूनमुळे काही मंडळींना जलप्रवासाचे योग येतील; तर काहींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या पंचम स्थानी असलेला हर्षल उच्च बौद्धिक अभ्यासास अनुकुल व यशदायक होईल. गुरु-हर्षल शुभ योग असल्याने काही मंडळींना अंतरज्ञान प्राप्त होईल तर कलावंतांना कलेत प्रगती करणे शक्य होईल. प्रेमप्रकरण असेल तर त्यात या राशीची मंडळी पुढाकार घेतील. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या राहूमुळे काही मंडळींचे विचार कपटी होणे संभवते. तसेच हाती सत्ता असेल तर वाममार्ग धन मिळविण्याची तीव्र इच्छा होईल. तसेच या राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणेही संभवते. जपा. श्रद्धा असेल तर "श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शक्ती व मन:शांती देईल. दररोज स्नान झाल्यावर नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळींचा शनि ग्रहाच्या साडेसातीचा प्रतिकुल काळ असल्यामुळे त्यांनी सतत सहनशील बनून, मनावर व विचारशक्तीवर ताबा ठेवून, तसेच शक्यतो मौन व्रत धारण करून नम्रतेचे आचरण केले तर खूपच सुखाचे होईल व त्यामुळे शारीरिक-मानसिक अनारोग्यही होणार नाही. शिवाय बुध -गुरु-शुक्र ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेने ज्या काही मनोनुकुल घटना घडतील त्यांचा आनंद व सुखसमाधान अनुभवू शकाल. रवि ग्रह पूर्णपणे अनुकुल असल्याने या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. मोठ्या लोकांच्या ओळखी होतील. वरिष्ठ तुमच्या कर्तृत्वावर प्रसन्न होतील. काही मंडळींना बढती, पगारवाढ, काहींना एखादे अधिकार पद तर क्वचित कोणास एखादे मानाचे स्थान वा उच्च पद मिळण्याची शक्यताही दिसते. रविसह असलेल्या बुधामुळे मानसिक व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. महिन्याच्या पूर्वार्धात प्रवास करू नका. प्रवासात त्रास, मनस्ताप, मानहानी होणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात हा मंगळ या राशीच्या दशम स्थानी गेल्यावर अधिक प्रतिकुल होईल व त्यामुळे स्वतंत्र व्यावसायिकांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडतील. . त्यामुळे काही मंडळींना हातची नोकरी वा व्यवसाय सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि येईल. पण त्यांनी तसे काही करू नये. या राशीच्या नोकरदार मंडळींना कामाचा ताण सहन करावा लागेल. या राशीच्या व्ययस्थानी असलेले शनि - केतू एकामागून एक अशी संकट परंपरा निर्माण करण्याची शक्यता आहे. जपा. विशेष करून आर्थिक चिंता त्रस्त करण्याची दाट शक्य आहे. जपा. म्हणून सर्व आर्थिक व्यवहार विचारपूर्वक व सावधानतेने करा. फसवणूक होणार नाही याची काळजी घ्या. नपेक्षा काही जणांच्या मागे कोर्ट लचांड लागेल व मनस्ताप व मानहानी सहन करावी लागेल. त्यामुळे शारीरिक-मानसिक अनारोग्य होणेही शक्य आहे. जपा. पण शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनाला आनंद देणाऱ्या घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या धनस्थानी असलेला नेपच्यूनही विविध कारणांनी आर्थिक चिंता व मनस्तापदायक असल्याचाच अनुभव येईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेला हर्षल कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभू देणार नाही. विक्षिप्त, चंचल व लहरी स्वभाव झाला तर घरीदारी कोणाशी पटणार नाही, आहे त्या परिस्थितीत सुखसमाधान लाभणार नाही, सतत तक्रारी करून सर्वांच्या सुखात बाधा निर्माण कराल. जपा. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या राहूमुळे हितशत्रू पराभूत होतील. ज्यांचा अन्य जाति धर्माच्या लोकांशी व्यावसायिक संबंध आहे अशांना अशा संबंधामुळे आर्थिक लाभ होणे संभवते. पण या राहूमुळे विषभय असल्याने बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करील. श्रद्धा असेल तर "श्रीशिवोपासना" मनशक्ती व मनशांती देईल. दररोज स्नान झाल्यावर या राशीच्या पुरुषानी " ओम नमः शिवाय " मंत्राचा तर स्त्रियांनी "ओम

शिवाय नमः" मंत्राचा एक माळ जप करावा. तसेच " शिवलीलामृत " स्तोत्राचे व "श्रीहनुमानचालिसा " स्तोत्राचे पठण करावे.

**(११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अतिशय कोमल झाली असल्यास मानसिक संवेदनाही अति तीव्र होत असतील, असे वाटते. तसे असेल तर मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच गहिरे नैराश्य येत असावे. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या हर्षलमुळे या राशीच्या मंडळींना उच्च बौद्धिक शक्ती, आकलन शक्ती व स्मरण शक्ती प्राप्त झाली असल्याचे जाणवते. तसे असेल तर या राशीची जी मंडळी उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्रात कार्यरत आहेत त्यांना हा हर्षल अनुकुल होईल व या मंडळींना आपल्या बौद्धिक संशोधन व शास्त्रीय संशोधन कार्यात
प्रगती करणे व यश मिळविणे सहज शक्य होईल. या राशीच्या काही भाग्यवंत मंडळींना परदेश गमनाची संधी मिळू शकेल. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या राहूमुळे संततिविषयक समस्या त्रस्त करील. तसेच या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. पण दलाली , कमिशनवर व्यवसाय असणारांना हा राहू अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या अष्टम स्थानी असलेला मंगळ प्रतिकुल असून अनारोग्यकारक होईल. काही मंडळींना उष्णताविकाराचा एखादा आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. काही मंडळींना मूळव्याधीसारखा आजार होणे संभवते. शिवाय अपघातभय असून जलभय व वीजभयही आहे. हाडमोड होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक होईल. पण महिन्याच्या पूर्वार्धात नियोजित कार्यात अडचणी, अडथळे निर्माण होणे संभवते. तसेच कामाचा मानसिक ताण, वरिष्ठांची अवकृपा, मानहानी, घरी वडील मंडळींचा विरोध सहन करावा लागण्याची शक्यता आहे. जपा. महिन्याच्या पूर्वार्धात प्रवास करू नका. प्रवासात त्रास, मानहानी होणे संभवते. महिन्याचा पूर्वार्ध स्वतंत्र व्यवसाय असणारांनाही प्रतिकुल होईल. महिन्याच्या उत्तारार्धात परिस्थितीत सुधारणा होईल व दिलासा मिळेल. लाभस्थानी असलेल्या शनीमुळे काहीही कारणाने संततिसुखात बाधा येणे संभवते. गुरु-केतू अनुकुल होतील व इच्छा आकांक्षा पूर्ण होतील. काही मंडळींना वाहनसुख मिळेल तर काहींना विवाहयोग येईल. धनलाभ होणेही संभवते. श्रद्धा असेल तर श्रीशंकराची उपासना मन:शक्ती व मन:शांती देईल. दररोज स्नान झाल्यावर या राशीच्या पुरुषांनी "ओम नमः: शिवाय" मंत्राचा तर स्त्रियांनी "ओम शिवाय नमः:" मंत्राचा एक माळ जप करावा. तसेच " श्रीशिवलीलामृत" स्तोत्राचे व "श्रीहनुमानचालीसा" स्तोत्राचे पठण करावे.

**(१२) मीन -** सध्या या राशीच्या व्ययस्थानी नेपच्यून असल्यामुळे या राशीच्या मंडळींची मानसिक स्थिती चिंताग्रस्त असल्याचे जाणवते. तसे असेल तर मानसिक व्यग्रतेमुळे नैराश्य येत असले पाहिजे.
पण हा नेपच्यून गुप्त पोलीस खात्यात कार्यरत असणारांना यशदायक होईल. या राशीच्या धनस्थानी असलेल्या हर्षलमुळे बुद्धी व मनस्थिती अतिशय अस्थिर, चंचल झाली असल्यास अविचाराने नको ते घडत असावे, तसेच अविचाराने खर्चही होता असावा. विचित्र आचरणही होत असावे असे वाटते. शिवाय आपल्या फटकळ बोलण्याने समोरच्याचा नकळत अपमानही होत असावा, असे वाटते. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेला राहू कौटुंबिक सुखात बाधा आणण्याची

शक्यता आहे. वाद, भांडणे, गैरसमज, अन्य कटकटी यांमुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागत असेल. या राशीच्या सप्तम-अष्टम स्थानी असणारा मंगळ वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. स्वतः:चे किंवा जीवनसाथीचे अनारोग्य, दोघांतील वाद, भांडणे, गैरसमज अशापैकी कारणांनी

वैवाहिक जीवन ढवळून निघेल. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे अशांनी संशय, गैरसमज अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. महिन्याच्या उत्तरार्धात हा मंगळ या राशीच्या अष्टम स्थानी गेल्यावर उष्णताविकाराचा एखादा आजार त्रस्त करील. जपा. काही मंडळींना मूळव्याधीसारखा आजार त्रस्त करील, तर अपघातामुळे कोणाची हाडमोड होणे संभवते. त्याशिवाय जलभय व वीज भय असल्याने सतत सावधानतेने आचरण करा. पण अष्टम स्थानी असलेला बुध अनुकुल असल्याने काही मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या नोकरदार मंडळींना नोकरीत या महिन्याचा संपूर्ण काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. नोकरीत कामाचा ताण, वरिष्ठांचा जाच, विरोध, मानहानी सहन करावी. लागेल. त्यामुळे अनारोग्य होणेही संभवते. पण शुक्राच्या अनुकुलतेने काही मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या दशम स्थानी असलेले गुरु-शनि चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना व कोळसा व्यापार असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होतील. तसेच त्याच स्थानी असलेल्या केतूमुळे आहे ती नोकरी सोडण्याचा विचार काही मंडळींच्या मनात येईल. पण त्यांनी तसे न करता आहे ती नोकरीच मनापासून करावी. कामावर दुर्लक्ष झाल्यास नोकरीतून बडतर्फ व्हावे लागण्याची शक्यता आहे. जपा. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शुक्र ग्रह या राशीच्या दशम स्थानी आल्यावर या राशीच्या व्यावसायिकांच्या व्यवसायात अडचणी, अडथळे निर्माण होणे संभवते, जपा. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शक्ती व मन:शांती देईल. दररोज स्नान झाल्यावर “बावन्न शलोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. शिवाय कुलदैवताच्या नामाचा एक माळ जप करा.

=====ooooo0ooooo=====